0 6 AUG 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ-क्रीडाई यांच्यात सामंजस्य करार



कोल्हापूर : विद्यापीठ व क्रीडाई यांच्यात सामंजस्य करार झाला. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडाईचे अध्यक्ष के. पी. खोत. डॉ व्ही. एन. शिंदे व अन्य मान्यवर.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग व क्रीडाई कोल्हापूर यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. उद्योगांना आवश्यक कुशल अभियंते, ज्ञान व तंत्रज्ञान यांची निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे असा या सामंजस्य कराराचा हेतू आहे. विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय प्रश्न घेऊन त्या अनुषंगिक प्रकल्प हाती घ्यावेत. त्याची उकल करण्यास क्रीडाई संस्थेच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली व डॉ. गिरीष कुलकर्णी यांनी तर क्रीडाईतर्फे अध्यक्ष के. पी. खोत व सचिव संदीप मिरजकर यांनी स्वाक्षरी केल्या.

तंत्रज्ञान अधिविभागातील सिव्हिल शाखेचे समन्वयक महेश साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले. यावेळी डॉ. व्ही. एस. पाटील, श्रीकांत भोसले, क्रिडाईचे सहसचिव गणेश सावंत, विजय माणगावकर, विश्वजित जाधव, आदित्य बेडेकर आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृतीत डी. आर. माने महाविद्यालय प्रथम



कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत पुरस्कार स्वीकारताना सुनील माने आणि प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले.

प्रतिनिधी
कागल

शिवाजी विद्यापीठामार्फत दरवर्षी देण्यात येणाऱ्या विविध गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये निमशहरी विभागात डी. आर. माने महाविद्यालयाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक गुणवत्ता, क्रीडा व निराधार विद्यार्थी या प्रकारामध्ये महाविद्यालयाच्या एकूण ३४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. सलग दुसऱ्या वर्षी डी. आर. माने महाविद्यालयाला हा बहुमान मिळालेला आहे.

पुरस्कार वितरण सोहळा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. महाविद्यालयातर्फे संस्थेचे उपाध्यक्ष सुनील माने व प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी अधिसभा सदस्य अमरसिंह रजपूत, प्रा. सचिन कांबळे व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

लोकमत

# 'प्रगत धातू ऑक्साइड' ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हपूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. एस. डी. डेळेकर संपादित 'प्रगत धातू ऑक्साइड व त्याची संमिश्रे यांचा उदयोन्मुख क्षेत्रातील उपयोग' या विषयावरील संदर्भग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या संदर्भग्रंथामुळे शिवाजी विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर भौतिक व रासायनिक विज्ञानामध्ये असलेल्या लौकिकामध्ये भर पडली असल्याचे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. हा ग्रंथ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या एलसेवीर या प्रकाशकाने नेदरलँड येथून प्रसिद्ध केला असून, या ग्रंथासाठी भारताबरोबर अमेरिका, ब्रिटन, आयर्लंड, दक्षिण कोरिया, चीन, तैवान या देशातील विविध नामवंत तज्ज्ञ वैज्ञानिकांचे योगदान मिळाल्याचे प्रा. डेळेकर यांनी सांगितले.

तरुण भारत

# 'उर्जा, वैद्यकीय, पर्यावरण, रासायनिक क्षेत्रात संदर्भ ग्रंथ दिशादर्शक'

कोल्हापूर : डॉ. एस. डी. डेळेकर संपादित 'प्रगत धातू ऑक्साईड व त्याची संमिश्रे यांचा उदयोन्मुख क्षेत्रातील उपयोग' या विषयावरील संदर्भ ग्रंथातून संशोधन व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये वापरल्या जाणाऱ्या धातू ऑक्साईडस व त्यांची समिश्रे यांचे महत्त्व मांडले आहे. ऊर्जा, वैद्यकीय, पर्यावरणीय व रासायनिक क्षेत्रातील संशोधनासाठी दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. संदर्भ ग्रंथाचे उद्‌घाटन शुक्रवारी डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. या ग्रंथामुळे शिवाजी विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील भौतिक व रासायनिक विज्ञानाच्या लौकिकामध्ये भर पडली असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. डॉ. डेळेकर म्हणाले, धातू, धातूचे ऑक्साइडस, मिश्र धातू, प्लॅस्टिक आदी वस्तु दैनंदिन वापरल्या जातात. त्यांच्या विविध पैलूंचे महत्त्व जाणण्यासाठी धातू ऑक्साईडस या विषयावरती हा संदर्भ ग्रंथ संपादित केला आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात 'सेरिकल्चर' अभ्यासक्रम


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात सेरिकल्चर स्पेशलायझेशन हा अभ्यासक्रम एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाला आहे. आठवी उत्तीर्ण शेतकऱ्याला रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. पदवीधर विद्यार्थ्यांसाठी रेशीमशास्त्राची पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. असे प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशीष देशमुख यांनी कळवले आहे.

जनसंपर्क कक्ष

06 AUG 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आय विटनेस

# मयूरा रे, फुलवीत ये रे पिसारा



शिवाजी विद्यापीठाच्या आवारातील या मोराने फुलवलेल्या पिसाऱ्यामुळे अंबरातल्या निळ्या घनाची शपथ तुला, मयूरा रे फुलवीत ये रे पिसारा या वीणा चिटको यांच्या गीताची आठवण आल्याशिवाय राहत नाही. थेंबाचे नूपुर बांधून रिमझिम पावसाच्या तालावर हा मोर नर्तन करीत आहे, याचे प्रत्यक्ष दर्शन घडले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

लोकमत

# मंगळवारी पुनर्प्रवेश परीक्षा होणार

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठातील २२ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी येत्या मंगळवारी पुनर्प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. एम. एस्सी. बॉटनी, एम.एस्सी झुलॉजी, एम.एस्सी. फिजिक्स यासह ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पहिल्या सत्रात सकाळी १०:३० ते दुपारी १२ या कालावधीत होणार आहेत. दुसऱ्या सत्रात सात अभ्यासक्रमांच्या परीक्षा दुपारी एक ते अडीच या वेळेत होतील. तर तिसऱ्या सत्रात बी. जे., एम. जे. यासह सात अभ्यासक्रमांच्या परीक्षा दुपारी ३:३० ते ५ या कालावधीत होतील. उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरअभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत.

06 AUG 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रानकवी ना. धो. महानोर यांना कविता वाचनातून अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी कवितेतील रानकवी ना. धो. महानोर यांचे निधन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाकडून ना. धो. महानोर यांच्या निवडक कवितांच्या वाचनातूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आले.

मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी महानोर यांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी डॉ. अरुण शिंदे व डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. सुखदेव एकल, रवी लोंढे व राजेश पाटील उपस्थित होते. यावेळी विभागातील विद्यार्थ्यांनी महानोर यांच्या निवडक कवितांचे वाचन केले.

पुढारी

# विद्यापीठाच्या मंगळवारी पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी विविध अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षांचे आयोजन केले आहे. एमएस्सी. केमेस्ट्री (ॲनालिटीकल,फिजिकल, ऑर्गेनिक, इंडस्ट्रीयल, अप्लाईड), एमएस्सी. बॉटनी, झूलॉजी, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर सायन्स, इन्व्हायरमेंटल सायन्स, एमएस्सी. मायक्रोबायलॉजी, एमए., एमएस्सी. (भूगोल), एमएस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, बीएस्सी., एमएस्सी. (अर्थशास्त्र), बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, वायसीएसआरडी (एमबीए, एमएसडब्ल्यू, एम.टेक.) एमए (योगाशास्त्र) आदी अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा सकाळी १० ते ५ यावेळेत होणार असल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन.शिंदे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठाकडून ६१६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. आजअखेर ६१६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाच्या वतीने शनिवारी बॅचलर ऑफ फार्मसी अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे झाली. परीक्षेला ४८ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, ५ ऑगस्ट रोजी एलएल.एम., एम.बी.ए. आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ रिएन्ट्रन्स परीक्षा मंगळवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर काही विषयांच्या जागा रिक्त असल्याने मंगळवार ८ ऑगस्ट रोजी तीन सत्रात रिएन्ट्रन्स परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये सकाळी १०.३० ते १२ या वेळेत एमएस्सी बॉटनी, झुलॉजी, फिजिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, ॲग्रो केमेकल ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट, एमएस्सी एन्व्हारमेंटल सायन्स विषयाची रिएन्ट्रन्स होणार आहे. दुपारी १ ते २.३० या वेळेत एमएस्सी स्टॅटीटीक्स, मायक्रोबायॉलॉजी, ग्रीन मायक्रोबायॉलॉजी, मॅथेमॅटीक्स, मॅथेमॅटीक्स वुइथ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन, एम. ए. एम. एस्सी. जिओग्राफी, एम. एस्सी. जिओग्राफी इन्फर्मेशन, एम. एस्सी. मेडीकल इनफर्मेशन मॅनेजमेंट, बी. एस्सी-एमएस्सी इकॉनॉमि दुपारी ३.३० ते ५ या वेळेत बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एम. बी. ए., एम. एस. डब्ल्य (यशवंतराव चव्हाण स्कूल रूरल डेव्हलपमेंट), एम. टेक. (यशवंतराव चव्हाण स्कूल रूरल डेव्हलपमेंट), एमएस्सी नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, एम. ए. योगाशास्त्र या विषयांची रिएन्ट्रन्स होणार आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ६१६ विषयांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल–२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बॅचलर ऑफ फार्मसीच्या अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. या परीक्षेला ४८ विद्यार्थी उपस्थित होते. शनिवारी एकही गैरप्रकार सापडला नाही. तर आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ६१६ विषयांचे निकाल जाहीर करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.